# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
## मा.स्थायी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक - १४६

**सभावृत्तांत**

दिनांक :- २२.१२.२००९ वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार दिनांक २२.१२.२००९ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती - सभापती
२. मा.भोंडवे गणेश तुकाराम
३. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ
४. मा.पिल्ले राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी
५. मा.नितीन उर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ
६. मा.कदम निर्मला सद्‌गुरु
७. मा.अशोक दशरथ सोनवणे
८. मा.जगदीश शंकर शेट्टी
९. मा.सौ.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
१०. मा.जितेंद्र बाबासाहेब ननावरे
११. मा.रामदास तानाजी कुंभार
१२. मा.सुरदास तुकाराम गायकवाड
१३. मा.सौ.सुलोचना बबन बढे

याशिवाय मा.आशिष शर्मा - आयुक्त, मा.डुंबरे-अति.आयुक्त,मा.सावंत, मा.गायकवाड,मा.गायकवाड,मा.मुंढे-सहा.आयुक्त,मा.राजदेरकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.काळे-नगरसचिव, मा.उगीले-शहर अभियंता,मा.तुपे-सह शहर अभियंता, मा.सावळे - अति.अधिक्षक अभियंता,मा.सुरगुडे -विकास अभियंता,मा.काची - उपशहर अभियंता,मा.डॉ.अय्यर - वैद्यकिय संचालक, मा.लोंढे-मुख्यलेखापाल, मा.चव्हाण, मा.बनकर,मा.जाधव,मा.निकम,मा.इंगळे,मा.दुधेकर,मा.थोरात,मा.पाटील, मा.ढगे-कार्य.अभियंता,मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्यमिक)हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेणेत आले -

विषय क्रमांक ४६) मा.महापौर व मा.उपमहापौर यांस कार्यालयीन कामकाजासाठी मोबाईल हँडसेट पुरविणेबाबत..

विषय क्रमांक ४७) अशुध्द जलउपसा केंद्र, रावेत येथील टप्पा ४ योजनेअंतर्गत पंपींग मशिनरी बसविणेबाबत..

विषय क्रमांक ४८) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.९१५९ दि.८/९/२००९ मध्ये दुरुस्ती करणेबाबत..मा.सुलोचना बढे ,मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ४९) ड व ब प्रभागातील कचरा वाहतुकीवर किमान वेतन दराने कर्मचारीबाबत..मा.आशा सुर्यवंशी,मा.सुलोचना बढे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ५०) प्रभाग कार्यालयाकडील सर्व नगर सदस्यांचा जयपुर येथील महापालिका विकास कामाच्या पाहाणीसाठी अभ्यासदौरा आयोजित करणेबाबत..मा.आशा सुर्यवंशी,मा.सुलोचना बढे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ५१) सन २००९ /१० चे अंदाजपत्रक तरतुद वर्ग करणेबाबत..मा.सुलोचना बढे,मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ५२) मानधनावर घेणेबाबत..मा.सुलोचना बढे,मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ५३) दि.२९/११/०९ रोजी झालेल्या कार्यक्रमासाठी भोजन व्यवस्थेपोटी झालेल्या खर्चास मान्यता देणेबाबत..मा.राजेश पिल्ले,मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक ५४) व्यायामशाळा चालविण्यास देणेबाबत..मा.निर्मला कदम,मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव..

---------------

मा.राजेश पिल्ले :- मा.स्थायी समिती सभा दिनांक १५/१२/२००९ ठराव क्र.१००२८ मध्ये “दै.लोकसत्ता” हा मजकुर वगळण्याची व त्याऐवजी “दै.लोकमत” हा मजकुर समाविष्ट करण्याची दुरुस्ती करण्यात यावी.

मा.स्थायी समिती सभा दिनांक १५/१२/२००९ ठराव क्र.१००२८ मध्ये “दै.लोकसत्ता” हा मजकुर वगळण्याची व त्याऐवजी “दै.लोकमत” हा मजकुर समाविष्ट करण्याची दुरुस्ती करण्यात आल्याचे व त्या दुरुस्तीसह दिनांक १५.१२.२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १४५) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---------------

ठराव क्रमांक :- १००५२ विषय क्रमांक :- १
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- सुरक्षा विभाग
सुचक- मा.ज्ञानेश्वर भालेराव अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.सुवि/३/कावि/१२७९/०९दि.२६/११/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मे.युनिक डेल्टा फोर्स सि.प्रा.लि. यांना ठेकेदारी पध्दतीने एकूण ८३ सुरक्षा रक्षक पुर्वीचे निविदेतील मान्य दर प्रति सुरक्षा रक्षक प्रति माह र.रू.५,९७९/- प्रमाणे १ वर्ष कालावधी करीता म्हणजेच दि.१/९/०९ ते दि.३१/८/१० अखेर १ वर्ष मर्यादेत नविन निविदा प्रसिध्द करून नविन निविदाकारास कामाचे आदेश देऊन प्रत्यक्ष कामकाज सुरू होईपर्यंत दि.३१/८/२०१० चे आत जी मुदत आधी संपेल तोपर्यंत सुरक्षा व्यवस्थेचे कामकाजास मुदतवाढ देणेस व त्यापोटी प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक :- १००५३ विषय क्रमांक :- २
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.ज्ञानेश्वर भालेराव अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/१/कावि/४३१/०९दि.८/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत विभागासाठी XLPE केबल साहित्य खरेदीकामी ई-नि.सु.क्र.१०/४-०९/१० अन्वये लघुत्तम निविदाकार मे.सुरज स्विचगेअर कं.भोसरी यांचे XLPE केबल ४ x १६ sq.mm (ॲटम क्र.१) साहित्याचे दर प्रति मिटर र.रू.१५२/-

प्रमाणे २५००० मिटरचे एकुण र.रू.३८,००,०००/- व XLPE केबल ३.५ x ३५ sq.mm (अॅटम क्र.२) साहित्याचे दर प्रति मिटर र.रू.२५०/- प्रमाणे १००० मिटरचे एकूण र.रू.२,५०,०००/- याप्रमाणे एकूण दर र.रू. ४०,५०,०००/- [र.रू.चाळीस लाख पन्नास हजार] स्विकृत करून करारनामा करणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००५४ विषय क्रमांक :- ३
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.ज्ञानेश्वर भालेराव अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/१/कावि/४३०/०९दि.८/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत विभागासाठी स्ट्रीट लाईट ४ x २४ वॅट फिटींग साहित्य खरेदीकामी ई-नि.सु.क्र.१०/४-०९/१० अन्वये लघुत्तम निविदाकार मे.सुरज स्विचगेअर कं.भोसरी यांचे स्ट्रीट लाईट ४ x २४ वॅट फिटींग साहित्याचे दर प्रति नग र.रू.४,८०२/- प्रमाणे १००० नगाचे एकूण र.रू.४८,०२,०००/- [र.रू.आठ्ठेचाळीस लाख दोन हजार] स्विकृत करून करारनामा करणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००५५ विषय क्रमांक :- ४
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- ब प्रभाग
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.एएमसी/बप्र/कावि/९/२३१/०९ दि.१०/१२/०९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/०९-१० मधील अ.क्र.१२० अन्वये, ब प्रभागा अंतर्गत रावेत उपविभागातील रस्ता रूंदीकरणात फिडर पिलर पोल हलविणेकामी मे.स्टार इले. सर्व्हिस (नि.र.रू.४,४८,३७६/- [र.रू.चार लाख आठ्ठेचाळीस हजार तीनशे शहात्तर] पेक्षा ३४.१५ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००५६ विषय क्रमांक :- ५
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- क प्रभाग विद्युत
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.भाउसाहेब सुपे
संदर्भ:-मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.कप्र/वि/९१८/०९ दि.११/१२/०९

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या हद्दीत मोशी बोऱ्हाडेवाडी येथे दि.१७/१२/०८ ते २१/१२/०८ या कालावधीत कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असुन मनपाकडून सदर ठिकाणी बचतगटांना ९ " X ६ " चे ८६ स्टॉल उपलब्ध करून देण्यात आले असल्याने या ठिकाणी स्पिकर, विद्युत, प्रकाश व्यवस्था करणे या कामाचा खर्च र.रू. २,२५,७६४/- नि.क्र.२/२१-०७/०८ पुर्व स्विकृत निविदा दर १.३७% कमी या दराने मे.त्रिमुर्ती मंडप स्पीकर ॲन्ड इलेक्ट्रीकल्स, निगडी यांस र.रू.२,२२,६७१/- [र.रू.दोन लाख बावीस हजार सहाशे एकाहत्तर] करारनामा न करता अदा करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००५७ विषय क्रमांक :- ६
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- विद्युत
सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.वि/बप्र/जा/१२६३/०९ दि.११/१२/०९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वॉर्ड क्र.५९ वाल्हेकरवाडी मधील अंतर्गत रस्त्यावर दिवाबत्तीची सोय करणे याकामाकरीता प्राप्त दरधारकांपैकी लघुत्तम दरधारक मे.ऋषीकेश एन्टरप्रायझेस यांचेकडून सदर काम अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा३.४ % कमी दराने करून घेणेस व करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे. (अं.र.रू.५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००५८ विषय क्रमांक :- ७
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- दुरसंचार
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.दुरसंचार/१/कावि/८१६/०९ दि.११/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महापौर चषक महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा २००९ करिता रिलायन्स मोबाईल यांचेकडील दोन नग वायरलेस ब्रॉंड बॅंड नेट कनेक्ट कनेक्शन करिता होणाऱ्या एकत्रित र.रू.१०,०००/- चे खर्चास व त्यातील र.रू.७,०००/- हार्डवेअर चार्जेस प्रथम अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००५९ विषय क्रमांक :- ८
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- औद्योगिक प्रशिक्षण केंद्र
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.रामदास कुंभार
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.औप्रके/२/कावि/११८५/०९ दि.१४/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे तासिका तत्वावर श्री.बडघर एल.डी., अ प्रभाग कार्यालय याना र.रू.११,२३२/- व श्री.बुटुळे आर.एस., ब प्रभाग कार्यालय याना र.रू.९,५७६/- मानधन देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००६० विषय क्रमांक :- ९
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- स्थापत्य मुख्यालय
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/३९३/०९ दि.१०/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.९/०८-०९ मधील अ.क्र.६ अन्वये, वाकड-थेरगांव रस्त्याचे २४.०० मी.रूंदी प्रमाणे रूंदीकरण करणे (चे १२०० ते २५००) (WBM & BBM) [Widening of Wakad Thergoan roads in D Ward (Ch १२०० to २५००) (HO)] कामी मे.साईप्रभा कस्ट्रक्शन (नि.र.रू.४९,००,०००/- [र.रू.एकोणपन्नास लाख] पेक्षा ३३.९३% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.३२,३७,४३०/- [र.रू.बत्तीस लाख सदोतीस हजार चारशे तीस] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००६१ विषय क्रमांक :- १०
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- स्थापत्य मुख्यालय
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.भाउसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/३९२/०९ दि.१०/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.९/०८-०९ मधील अ.क्र.५ अन्वये, वाकड-थेरगांव रस्त्याचे २४.०० मी.रूंदी प्रमाणे रूंदीकरण करणे (चे ०००० ते १२००) (WBM & BBM) [Widening of Wakad Thergoan roads in D Ward (Ch ०००० to १२००) (HO)] कामी मे.परमानंद ए.कृपलानी (नि.र.रू.४८,००,०००/- [र.रू.आठ्ठेचाळीस लाख] पेक्षा २५.५१% कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००६२ विषय क्रमांक :- ११
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- स्थापत्य मुख्यालय
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/३९१/०९ दि.१०/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.८/२००९-१० मधील अ.क्र.६ अन्वये, प्र.क्र.८७ वाकड गावठाण मधील करपे वस्ती व माने वस्ती व परिसरातील रस्त्यांचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे.मोहनलाल मथरानी कंन्ट्रक्शन प्रा.लि. (नि.र.रू.४६,३५,१३३/- [र.रू.शेहचाळीस लाख पस्तीस हजार एकशे तेहतीस] पेक्षा २६.३७ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १०% पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००६३ विषय क्रमांक :- १२
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- स्थापत्य मुख्यालय
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/३८६/०९ दि.१०/१२/०९
विषय :- ई निविदा नोटीस क्र.८/२००९ - १० काम क्र.१ या कामांचे करारनामे करणेस मंजुरी मिळणेबाबत..

विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००६४ विषय क्रमांक :- १३
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- स्थापत्य मुख्यालय
सुचक- मा.अशोक सोनवणे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/३८७/०९ दि.१०/१२/०९
विषय :- ई निविदा नोटीस क्र.८/२००९ - १० काम क्र २ या कामांचे करारनामे करणेस मंजुरी मिळणेबाबत..

विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००६५ विषय क्रमांक :- १४
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- स्थापत्य मुख्यालय
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.अशोक सोनवणे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/३८८/०९ दि.१०/१२/०९
.विषय :- निविदा नोटीस क्र.८/२००९ १० काम क्र ३ करारनामे करणेस मंजुरी मिळणेबाबत..

विषय क्रमांक १४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००६६ विषय क्रमांक :- १५
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- स्थापत्य मुख्यालय
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/३८९/०९ दि.१०/१२/०९
विषय :- ई निविदा नोटीस क्र. ८/२००९- १० काम क्र.४ या कामाचे करारनामे करणेस मंजुरी मिळणेबाबत..

विषय क्रमांक १५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००६७ विषय क्रमांक :- १६
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- स्थापत्य मुख्यालय
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/३९०/०९ दि.१०/१२/०९
विषय :- निविदा नोटीस क्र.८/२००९ - १० काम क्र.५ या कामांचे करारनामे करणेस मंजुरी मिळणेबाबत..

विषय क्रमांक १६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००६८ विषय क्रमांक :- १७
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- क प्रभाग
सुचक- मा.अशोक सोनवणे अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.कप्र/लेखा/नि.क/कावि/१२७७/०९ दि.१०/१२/०९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.५७ अन्वये, वॉर्ड क्र.१९ मध्ये स्थापत्य विषयक दुरुस्ती कामे करणेकामी मे.शुभश्री कन्ट्रक्शन (गणेश जाधव) (नि.र.रू.४,५०,०००/- [र.रू. चार लाख पन्नास हजार] पेक्षा ४१% कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००६९ विषय क्रमांक :- १८
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- क प्रभाग
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.कप्र/लेखा/नि.क/कावि/१२७९/०९ दि.१०/१२/०९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.३ अन्वये, वॉर्ड क्र.१३ दिघी विनयनगर येथिल गटर्स दुरुस्ती करणे व स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.शुभश्री कन्ट्रक्शन (नि.र.रू.४,५०,०००/- [र.रू. चार लाख पन्नास हजार] पेक्षा ४१% कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००७० विषय क्रमांक :- १९
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- क प्रभाग
सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.कप्र/लेखा/नि.क/कावि/१२८१/०९ दि.१०/१२/०९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.६३ अन्वये, वॉर्ड क्र.२२ मध्ये विविध ठिकाणी स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणेकामी मे.शुभश्री कन्ट्रक्शन (गणेश जाधव) (नि.र.रू.३,७५,०००/- [र.रू.तीन लाख पंच्याहत्तर हजार] पेक्षा ४०.३७ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००७१ विषय क्रमांक :- २०
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- क प्रभाग
सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.कप्र/लेखा/नि.क/कावि/१२७३/०९ दि.१०/१२/०९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.२० अन्वये, वॉर्ड क्र.२६ महात्मा फुले नगर येथे हॉकी पॉलिग्रास मैदानावर पाणी मारणेसाठी पाईप लाईन करणेकामी शुभम उद्योग (नि.र.रू.४,६१,८९६/- [र.रू. चार लाख एकसष्ठ हजार आठशे शहान्नव] पेक्षा १८.९९% कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००७२ विषय क्रमांक :- २१
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- क प्रभाग
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.कप्र/लेखा/नि.क/कावि/१२७५/०९ दि.१०/१२/०९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.५४ अन्वये, वॉर्ड क्र.१९ मध्ये ठिकठिकाणी प्रिमिक्स कारपेट पध्दतीने डांबरीकरण करणेकामी मे.गजानन वाल्हेकर (नि.र.रू.३,७५,०००/- [र.रू.तीन लाख पंच्याहत्तर हजार] पेक्षा २५.२५ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक :- १००७३ विषय क्रमांक :- २२
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मंभा/९/कावि/५०१/०९
दि.१४/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

निविदा न मागविता करारनामा न करता तातडीची बाब म्हणून जकात विभागास आवश्यक असलेले ५ नग कॅश बॉक्स मे.गोदरेज ॲन्ड बॉयस मॅन्यु.कं.इ.लि. कंपनीकडून थेट खरेदी करणेस व येणाऱ्या एकूण र.रू.२३,८७०/- [र.रू.तेवीस हजार आठशे सत्तर] अधिक डिलीव्हरी चार्जेस या खर्चास व सदरची रक्कम मे.गोदरेज ॲन्ड बॉयस मॅन्यु.कं.इ.लि. यांना आगाऊ स्वरूपात अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००७४ विषय क्रमांक :- २३
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- औद्योगिक प्रशिक्षण केंद्र
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.औप्रके/२/कावि/११८८/०९
दि.१४/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मोरवाडी येथे १६ व्यवसायांचे प्रशिक्षण देणेत येत असून या संस्थेतील व्यवसायांच्या वर्कशॉपचे उपयुक्त व योग्य इंटेरिअर डेकोरेशन करणेकरिता अनुभवी आर्किटेक्टची नियुक्ती करणे आवश्यक असल्यानुसार मनपाच्या कामाचा पुर्वानुभव असणाऱ्या आर्किटेक्ट मे.निता कुलकर्णी असोशिएट्स, निगडी प्राधिकरण यांचेकडून सुयोग्य प्लॅनिंग करून घेणेकामी त्यांची नेमणुक करणेस व त्यांना मनपाच्या प्रचलित दराने फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००७५ विषय क्रमांक :- २४
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- माध्यमिक शिक्षण
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/१/कावि/८७०/०९
दि.१४/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क्रीडा प्रबोधिनी विद्यालयासाठी श्री.शंकर सोनवणे (तज्ञ क्रीडा मार्गदर्शक) यांना दि.१/१२/०९ पासून पुढील ६ महिने कालावधीसाठी र.रू.७,५००/- [र.रू. सात हजार पाचशे] एकत्रित मानधनावर मुदतवाढ देणेस व त्यांच्या मानधनापोटी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक :- १००७६ विषय क्रमांक :- २५
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- क प्रभाग विद्युत
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कप्र/वि/जा/९१९/०९
दि.११/१२/०९
विषय :- मनपा क प्रभाग अंतर्गत भांडवली लेखाशिर्षांतर्गत कोटेशन व थेट पध्दतीने केलेल्या कामाची मंजुरी घेणेबाबत..

विषय क्रमांक २५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००७७ विषय क्रमांक :- २६
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मंभा/९/कावि/५०२/०९
दि.१४/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या नागरी सुविधा केंद्रासाठी आवश्यक एक नग तिजोरी गोदरेज अँड बॉईस् मॅन्यु.कं.लि. यांचेकडून करारनामा न करता थेट खरेदी करण्यास मान्यता देणेत येत आहे. [ अं.र.रू.३२,९७०/- (+ इनस्टॉलेशन चार्ज) ]

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००७८ विषय क्रमांक :- २७
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- आरोग्य मुख्यालय
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आ/८/कावि/१२४/०९
दि.३०/११/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या आरोग्य मुख्यालयाकडे मनपाने खरेदी केलेल्या व जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत खरेदी केलेल्या ४६ वाहनांची नोंदणी फी, विमा व वाहनांवर नोंदणी क्रमांक रंगविणे, मनपाचे नांव टाकणे इत्यादीसाठी च्या र.रू.४३,६००/- खर्चास तसेच आगाऊ र.रू.३९,०००/- चे समायोजन करून जादा झालेला खर्च र.रू.४,६००/- आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे नांवे अदा करण्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००७९ विषय क्रमांक :- २८
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- आरोग्य मुख्यालय
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमु/३/कावि/६५१/०९ दि.१४/१२/०९
विषय :- बुलडोझरच्या सहाय्याने कचरा सपाटीकरण करणे कामाच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत..

विषय क्रमांक २८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००८० विषय क्रमांक :- २९
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मंभा/८/कावि/६३७/०९ दि.१५/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.स्थायी समिती ठराव क्र.९६८४ दि.१०/११/०९ अन्वये मे.अमृत मुद्रणालय तसेच मे.ऐश्वर्या एंटरप्रायजेस यांच्याकडून मंजूर दराने पुढील दोन वर्षाकरीता काम करवून घेण्यास व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता दिलेली असून या निविदेमध्ये मे.ऐश्वर्या एंटरप्रायजेस सहभागी नसल्याने त्यांचेकडून काम करून घेणे प्रशासनास शक्य नसल्याने ठराव क्र.९६८४ दि.१०/११/०९ मध्ये नमुद केलेले मे.ऐश्वर्या एंटरप्रायजेस यांचे नाव ठरावातून वगळणेत येत आहे व मे.ऐश्वर्या एंटरप्रायजेस यांचे ऐवजी निविदेतील सहभागी दुसरे लघुत्तम दर निविदाधारक मे.आशिष एंटरप्रायजेस यांना सदर निविदेनुसार प्राप्त झालेल्या बाबींसाठी ३० नोव्हेंबर २००९ पर्यंतचे मंजूरी ऐवजी मुळ विषयानुसार आदेशाचे तारखेपासून एक वर्ष कालावधीसाठी काम करून घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००८१ विषय क्रमांक :- ३०
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- आरोग्य मुख्य
सुचक- मा.अशोक सोनवणे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उशोप/कावि/६३३/०९ दि.११/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

उपद्रव शोध पथकासाठी प्रस्तावात नमुद तीन वाहन पुरवठा धारकांना पुर्वीच्याच म्हणजेच प्रति वाहन प्रति दिन ६० कि.मी. साठी र.रू.५९०/- व त्यापुढील प्रत्येक कि.मी.साठी र.रू.५/- या दराने दोन महिने कालावधीसाठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास करारनामा करून कामकाज आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००८२ विषय क्रमांक :- ३१
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- क प्रभाग
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक- मा.अशोक सोनवणे
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.कप्र/लेखा/निक/कावि/१२८५/०९ दि.१४/१२/०९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.१ अन्वये, वॉर्ड क्र.१३ दिघी माऊलीनगर येथे गटर्स करणे व स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.बालाजी कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.४,५०,०००/- [र.रू. चार लाख पन्नास हजार] पेक्षा ४१ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००८३ विषय क्रमांक :- ३२
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- क प्रभाग
सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.कप्र/लेखा/निक/कावि/१२८३/०९ दि.१४/१२/०९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.२ अन्वये, वॉर्ड क्र.११ वडमुखवाडी येथील भारत मातानगर येथे रस्त्याच्या कडेने अर्धगोल गटर्स करणे व स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.बालाजी कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.४,५०,०००/- [र.रू. चार लाख पन्नास हजार] पेक्षा ४१.१० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००८४ विषय क्रमांक :- ३३
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- ड प्रभाग
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.ड/नि/३/कावि/११६२/०९ दि.१४/१२/०९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ड प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९/१० मधील अ.क्र.५७ अन्वये, प्र.क्र.९७ पिंपळेगुरव येथील गंगोत्री नगर येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणेकामी मे.शिवसाई कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.४,६६,५७३/- [र.रू.चार लाख सहासष्ठ हजार पाचशे त्र्याहत्तर] पेक्षा १९ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक :- १००८५ विषय क्रमांक :- ३४
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- ड प्रभाग
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक- मा.नितीन ओव्हाळ
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.ड/नि/३/कावि/११६३/०९दि.१४/१२/०९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ड प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९/१० मधील अ.क्र.५८ अन्वये, प्र.क्र.९५ कवडेनगर मधील गणेशनगर भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणेकामी मे.शिवसाई कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.४,६६,३८७/- [र.रू.चार लाख सहासष्ठ हजार तीनशे सत्याऐंशी] पेक्षा १९ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००८६ विषय क्रमांक :- ३५
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- ड प्रभाग
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.ड/नि/३/कावि/११६४/०९ दि.१४/१२/०९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ड प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९/१० मधील अ.क्र.५९ अन्वये, प्र.क्र.९७ पिंपळेगुरव गावठाण भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणेकामी मे.शिवसाई कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.४,६६,१०६/- [र.रू.चार लाख सहासष्ठ हजार एकशे सहा] पेक्षा २२.५० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००८७ विषय क्रमांक :- ३६
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- ड प्रभाग
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ:-मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.ड/नि/३/कावि/११६५/०९ दि.१४/१२/०९

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ड प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९/१० मधील अ.क्र.६० अन्वये, प्र.क्र.९८ सुदर्शननगर मधील श्रीकृष्ण मंदिर भागातील रस्ते डांबरीकरण करणेकामी मे.शिवसाई कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.४,६६,७६०/- [र.रू.चार लाख सहासष्ठ हजार सातशे साठ] पेक्षा २१.६० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००८८ विषय क्रमांक :- ३७
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- विद्युत मुख्य
सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.विद्युत/नि/१अ/कावि/३५५/०९ दि.१५/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.३/०८/०९ मधील अ.क्र.२ अन्वये, सांगवी उपविभागांतर्गत व्हिजन २००५ मधील रस्त्यांना अडथळा ठरणारे लघुदाब व उच्चदाब खांब व वाहिन्या हलविणेकामी मे.बेस्ट इलेक्ट्रीकल्स (नि.र.रू.१,०८,००,०००/- [र.रू.एक कोटी आठ लाख] पेक्षा २३.५५ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००८९ विषय क्रमांक :- ३८
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- आरोग्य मुख्यालय
सुचक- मा.अशोक सोनवणे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमु/३/कावि/६४५/०९ दि.१४/१२/०९
विषय :- मोशी कचरा डेपो येथे दैनंदिन जमा होणारा कचरा बुलडोझरच्या सहाय्याने सपाटीकरणाचे काम करणेबाबत..

विषय क्रमांक ३८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००९० विषय क्रमांक :- ३९
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- नगरसचिव
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.नगरसचिव यांचे जावक क्र.नस/१/कावि/१५९८/०९ दि.१५/१२/०९

मा.नगरसचिव यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र ‘अ’ मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००९१ विषय क्रमांक :- ४०
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- पाणीपुरवठा
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.राजेश पिल्ले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/नि/१७१८/०९ दि.१६/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.५/०९-१० मधील अ.क्र.३ अन्वये, जलशुध्दीकरण केंद्र से.२३ च्या आवारात डांबरीकरणाचे व इतर अनुषंगिक कामे करणेकामी मे.युनिक ट्रेडर्स (नि.र.रू.२२,९३,९५९/- [र.रू.बावीस लाख त्र्यान्नव हजार नऊशे एकोणसाठ] पेक्षा २१.९० % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००९२ विषय क्रमांक :- ४१
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- पाणीपुरवठा व जलनि:सारण
सुचक- मा.नितीन ओव्हाळ अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/जनि/८३८/०९ दि.१६/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पाणीपुरवठा JNNURM प्रकल्पातील पाणीपुरवठा कामांची निविदा नोटीस प्रसिध्दीकामी प्रस्तावात नमुद प्रमाणे जाहीरात खर्चापोटी दै.लोकसत्ता व दै.इंडियन एक्सप्रेस यांचे एकत्रित र.रू.४,१२,८००/- [र.रू.चार लाख बारा हजार आठशे] अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००९३ विषय क्रमांक :- ४२
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- मध्यवर्ती साहित्य भांडार,वैद्यकिय
सुचक- मा.ज्ञानेश्वर भालेराव अनुमोदक- मा.भाउसाहेब सुपे
संदर्भ:-मा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचे जावक क्र.मसाभां/५/कावि/९२७/०९ दि.१६/१२/०९

मा.आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या वाय.सी.एम.रूग्णालयाच्या इमारती मधील डक्ट व ड्रेनेज लाईनची साफसफाई मे.विशाल सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर यांचे समवेत झालेल्या करारनाम्यास अधिन राहून त्यांचेकडून प्राप्त झालेल्या निविदा दरानुसार म्हणजेच प्रति महिना र.रू. ५९,९९९/- [र.रू.एकोणसाठ हजार नऊशे नव्यान्नव] याप्रमाणे दिनांक ६/११/२००९ पासून पुढील तीन वर्ष कालावधीकरीता काम करून घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००९४ विषय क्रमांक :- ४३
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- वाय सी एम एच
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/१/कावि/२११/०९ दि.१७/१२/०९
विषय :- वायसीएम रुग्णालयास तातडीने आवश्यक असणारे औषध साहित्य पुरविणेबाबत..

विषय क्रमांक ४३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००९५ विषय क्रमांक :- ४४
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- मुख्य लेखापरिक्षक
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.निर्मला कदम
संदर्भ:-मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/१८८/०९ दि.१६/१२/०९

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागाकडील नोव्हेंबर २००९ मधिल सुधारित एकूण कामकाज विषयक गोषवारा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १००९६ विषय क्रमांक :- ४५
दिनांक - २२.१२.२००९ विभाग :- मुख्य लेखापरिक्षक
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ:-मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/१८९/०९ दि.१७/१२/०९

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.७.१२.२००९ ते दि.१३.१२.२००९ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/१८९/२००९ दि.१७.१२.२००९ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले-</u>

ठराव क्रमांक- १००९७ विषय क्रमांक- ४६
दिनांक- २२.१२.२००९ विभाग- दूरसंचार
सुचक- मा.गणेश भोंडवे अनुमोदक- मा.भाऊसाहेब सुपे
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.दूरसंचार/९०५/२००९ दि.२२/१२/२००९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मा.महापौर व मा.उपमहापौर यांस ई-७२ या प्रकारचे दोन नविन मोबाईल संच मे.स्कायलिंक, चिंचवड यांचेकडून थेट पध्दतीने, करारनामा न करता व निविदा न मागविता खरेदी करणेस व येणाऱ्या र.रू.४६,०००/- [र.रू.शेहचाळीस हजार] चे खर्चास तसेच त्यांचे पदाला असणारी दूरध्वनी व मोबाईल वापराची अधिकतम मर्यादा पुर्वीप्रमाणेच कायम ठेवून त्यांचे मोबाईल व निवासी कार्यालयातील दूरध्वनीचे मासिक बिल अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १००९८ विषय क्रमांक- ४७
दिनांक- २२.१२.२००९ विभाग- जलशुध्दीकरण केंद्र
सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जशुकें/वि/४४८/०९ दि.२२/१२/०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

अशुध्द जलउपसा केंद्र, रावेत येथील टप्पा ४ योजने अंतर्गत पंपींग मशिनरी बसविणेचे कामाकरिता मे.इटेंग इंजिनिअरिंग, मुंबई या सल्लागार संस्थेसी निविदा न मागविता तथापि नियमानुसार करारनामा करून नेमणूकीस आणि येणारे र.रू.१,८७,५१०/- (चालू सेवा कर १०.३ %) किंवा प्रत्यक्ष देयके अदा करतेवेळी असणाऱ्या सेवाकरासह होणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १००९९ विषय क्रमांक- ४८
दिनांक- २२.१२.२००९
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ- मा.सुलोचना बढे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.९१५९ दि.८/९/०९ मध्ये नमुद अ.क्र.२ कै.दशरथ नामदेव कापसे व्यायामशाळा ही समर्थ हनुमान मित्र मंडळ या संस्थेस सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास दिलेल्या कराराची मुदत दि.२६/६/०९ रोजी संपल्याने पुढील कराराची तारीख दि.२७/६/०९ ते २६/५/२०१० अशी दुरुस्ती करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१०० विषय क्रमांक- ४९
दिनांक- २२.१२.२००९
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ- मा.आशा सुर्यवंशी, मा.सुलोचना बढे यांचा प्रस्ताव...

प्रभाग ड व ब या प्रभागातील कचरा वाहतूकीवर मे.महालक्ष्मी स्वयं.रोजगार सेवा सह. संस्था मर्या. यांचेकडून किमान वेतन दराने कर्मचारी पुरविण्यास व येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१०१ विषय क्रमांक- ५०
दिनांक- २२.१२.२००९
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.सुलोचना बढे
संदर्भ- मा.आशा सुर्यवंशी, मा.सुलोचना बढे यांचा प्रस्ताव...

ब, क, ड व अ प्रभाग कार्यालयाकडील सर्व नगरसदस्यांनी जयपूर महानगरपालिकेने केलेल्या विविध विकास कामाची पाहणी व अभ्यास दौरा आयोजित करणेबाबत मागणी केली असून त्या अनुषंगाने प्रभाग कार्यालयाकडील सर्व नगरसदस्य व अधिकारी/कर्मचारी यांना जयपूर महानगरपालिकेने केलेल्या विविध विकास कामाची पाहणी व अभ्यास दौरा नजिकच्या काळात आयोजित करणेत येणार असून त्याअन्वये सदर अभ्यास दौऱ्यास व प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१०२ विषय क्रमांक- ५१
दिनांक- २२.१२.२००९
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ- मा.सुलोचना बढे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

महापालिकेच्या सन २००९-१० चे अंदाजपत्रकात खालील प्रमाणे तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र. / अ.क्र. | सन ०९-१० ची तरतूद | वाढ | घट | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भोसरी वॉर्ड क्र. २१ व वॉर्ड क्र. २२ मध्ये ठिकठिकाणी पेव्हींग ब्लॉक बसविणे | दगडी फरशी व फुटपाथ | २८५ / १३ | ३४,८०,००० | २,६५,००० | ------ | पान क्र. २८८ अ.क्र.८ वरून वर्ग |
| २ | क प्रभागातील वॉर्ड क्र१० मोशी येथील डुंडुळगांव येथे घाट बांधणे व अनुषंगिक स्थापत्य विषयक कामे करणे | क) घाट | २६७ / ३ | २७,१८,००० | ८,१५,००० | ------ | पान क्र. २८८ अ.क्र.८ वरून वर्ग |
| ३ | भोसरी शांती नगर येथे सी. डी. वर्क बांधणे | पूल व प्रकल्प | २८८ / ८ | १२,८०,००० | ------- | १०,८०,००० | पान क्र. २८८ अ.क्र. १३ वर व पान क्र.२६७ अ.क्र.३ वर वर्ग |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१०३ विषय क्रमांक- ५२
दिनांक- २२.१२.२००९
सुचक- मा.सुलोचना बढे अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ- मा.सुलोचना बढे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

खाली नमूद केलेल्या व्यक्तीस त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या पदी व मानधनावर सहा महिने कालावधीसाठी नेमण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

| नाव | पदनाम | र.रु. |
|---|---|---|
| निलेश उत्तम धनवटे | फायरमन | ५०००/- |
| सुलक्षणा किरण कुरणे | समुह संघटिका | ७०००/- |
| अमृता श्रीरंग धोत्रे | कॉम्प्युटर ऑपरेटर | ५०००/- |
| स्मीता जयमल्हार शिंदे | फिजीओथेरेपिस्ट | ७०००/- |

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१०४ विषय क्रमांक- ५३
दिनांक- २२.१२.२००९
सुचक- मा.राजेश पिल्ले अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ- मा.राजेश पिल्ले, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

दि२९/११/०९ रोजी आयोजित पत्रकार परिषदेसाठी भोजन व्यवस्था हॉटेल वेदास फॅमिली रेस्टारंट, आकुर्डी येथे करणेत आलेली असल्याने भोजन व्यवस्थेपोटीच्या र.रू.१३,५२०/- [र.रू.तेरा हजार पाचशे वीस] खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक- १०१०५ विषय क्रमांक- ५४
दिनांक- २२.१२.२००९
सुचक- मा.निर्मला कदम अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ- मा.निर्मला कदम, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

सदानंद तरूण मित्र मंडळ यांस बालभवन खराळवाडी येथील व्यायामशाळा ११ वर्षे कालावधी करीता द.म.र.रू.२,०००/- सेवा शुल्क तत्वावर देखभाल संरक्षण व चालनकामी देण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/१४६७/२००९
दिनांक - २४/१२/२००९ चे लगत

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.